सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय ,भंडारा,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.01784-251222 E-Mail- ddmobnd@gmail.com

**वाचा :**१ आपत्ती व्यवस्थापनकायदा, २००५ चेकलम३०, ३३, ३४,४१ व कलम ५१

२. महाराष्ट्र शासन क्रमांक करोना२०२०/प्रा.क्र.५८/ आरोग्य ५ दिनांक १४ मार्च २०२०

3. या कार्यालयाचे आदेश क्र. अका/1-10/दंड/कावसु/कावि/-407/20 दि. 22/3/2020

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण.**
**जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा**
**क्र.कक्ष/जिकाभं/जि.आ.व्य.अ./**B43**/२०२०**
**दिनांक :-**२५**/०३/२०२०**

## आदेश

राज्य शासनाने करोना विषाणूचा ( कोव्हीड १९ ) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३,व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आली असून स्वातंत्र्यरित्या निर्गमित करण्यात येत आहे. तसेच सदर्भ क्र. ०२ मधील परिच्छेद ०३ नुसार कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ वर नियंत्रण आणने व प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी घोषीत करण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने संदर्भिय क्र. 3 अन्वये भंडारा जिल्ह्यामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1) अन्वये करोना विषाणु संसर्ग झालेल्या रुग्णापासुन व त्यांच्या संपर्कात आलेल्या अन्य इसमांपासुन दुसऱ्या इसमांस विषाणुचा प्रार्दुभाव होवु नये या बंदी आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे. सदर आदेशांमध्ये अत्यावश्यक सेवा, किराणा माल, भाजीपाला, दुध, औषधे व स्वास्थ सेवासंबंधी दुकाने यांना प्रतिबंध घालण्यात आलेले नाही. परंतू कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी वरील बाबींवर अंशत: अंकुश लावणे अनिवार्य झालेले आहे.

त्यानुषंगाने पुढिलप्रमाणे आदेशीत करण्यात येत आहे.

1) सर्व किराणा दुकाने हे केवळ सकाळी 11.00 ते सायं 04.00 दरम्यानच सुरु राहतील.

2) अत्यावश्यक सेवा, किराणा माल, भाजीपाला, दुध, औषधे व स्वास्थ सेवासंबंधी दुकाने यांमध्ये येणाऱ्या नागरीकांना प्रादुर्भाव होणार नाही यानुषंगाने नागरीकांमध्ये अंतर ठेवण्याकरीता दुकानातील फरशींवर (Floor) चुना अथवा इतर ने लाईन मारुन तात्काळ व्यवस्था करण्यात यावी. सदर लाईन टाकण्याची व येणाऱ्या ग्राहकांमध्ये सुरक्षीत अंतर ठेवण्याची संपुर्ण जबाबदारी ही संबंधित दुकानदाराची राहिल.

वरीलप्रमाणे आदेशाचे पालन न करणाऱ्या कोणतीही व्यक्ती, संस्था, अथवा समुह आपत्ती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 अन्वये आणि भारतीय दंड सहिंता 1860 मधील कलम 188 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व कार्यवाही करण्यात येईल.

Pradip

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,भंडारा**
**जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा**

**प्रती** -१. सर्व विभाग प्रमुख ---------------------------------------------------------------- जिल्हा भंडारा

**प्रत**-१.मा. विभागीयआयुक्त, नागपुर विभाग नागपुर यांचेकडे माहितीस्तव सविनय सादर.

२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडे माहितीस्तव सविनय सादर.

Scanned by CamScanner